REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ९ आगस्ट, १९५० | अंक ३२

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

१००० टनांच्या नवीन मशिनरीच्या उभारणीकरितां बँकेकडून कॅश क्रेडिट घेण्यापेक्षां, बँकेच्याच ६ टक्के व्याजाच्या दरानें एक वर्ष मुदतीच्या प्रत्येकीं फक्त एक हजार रुपयांच्या ठेवी कंपनीचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांचेकडून कंपनी हल्लीं स्वीकारीत आहे.

फॉर्म व माहितीसाठीं खालील पत्त्यावर लिहावें:—

पत्ता:—
९८०, सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. ११-७-१९५०.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे आणि कंपनी
मॅनेजिंग एजंटस.

दळणाच्या चक्या-टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

**खेळाच्या सामानासाठी कच्चा माल**—हॉकीच्या काठ्या आणि बॅडमिंटन रॅकेटस ह्यांच्यासाठी लागणारें लाकूड पुरविण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनें तुतीचीं आणि ॲशचीं झाडें लावण्याचें ठरविलें आहे. फाळणी झाल्यावर हीं लाकडें भारताला मिळेनाशीं झालीं. तुतीचीं १० हजार एकरांत आणि ॲशचीं २ हजार एकरांत झाडें लावण्यांत येणार आहेत. ह्या योजनेसाठी २६,००,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**पूर्व जर्मनीचा औद्योगिक कार्यक्रम**—रशिअन व्याप्त पूर्व जर्मनीनें आपला पांच वर्षांचा औद्योगिक कार्यक्रम जाहीर केला. ह्या कार्यक्रमाप्रमाणें पूर्व जर्मनीचें औद्योगिक उत्पादन १९५५ मध्यें १९३६ सालच्या उत्पादनाच्या दुप्पट करण्यांत येणार आहे. अमेरिकेची मार्शल मदत योजना न स्वीकारतांहि आर्थिक उन्नति कशी करून घेतां येते, हें दाखविण्याचा हेतु कार्यक्रमाच्या मुळाशीं आहे.

**भारताचा चित्रपट धंदा**—चित्रपटाच्या धंद्यांत भारताचा अनुक्रम दुसरा लागतो असें युनेस्कोच्या अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. पहिला अनुक्रम अमेरिकेचा लागतो. अमेरिकेंत दरसाल सुमारें ४३२ चित्रपट तयार होतात. इतर देशांतील संख्या पुढील प्रमाणें आहे. भारत २५०, जपान १२३, फ्रान्स १०३, मेक्सिको ८४. ब्रिटनचा नंबर जगांत ६ वा लागतो. ब्रिटनमध्यें दरसाल ७१ चित्रपट तयार होतात.

**घटस्फोटासाठी स्त्रिया अधिक तयार**—गेल्या दोन वर्षांत संयुक्त प्रांतांत १२३१ घटस्फोटाचे अर्ज दाखल करून घेण्यांत आले. हे सर्व अर्ज स्त्रियांतर्फे करण्यांत आले होते. पुरुषांतर्फे फक्त ५७ अर्ज करण्यांत आले. स्त्रियांच्या अर्जांपैकीं १०८४ अर्जांत नवरा नीट वागवीत नाहीं अगर निर्दयपणें वागतो असें कारण देण्यांत आलें होतें. एका स्त्रीनें नवरा कुरूप असल्याचें कारण दिलें होतें. पुरुषांच्या ५७ अर्जांपैकीं ५६ जणांनीं बायको सोडून गेल्याचें कारण दिलें होतें.

**अमेरिकन कंपनीचा अगडबंब नफा**—स्टील कॉर्पोरेशन ऑफ अमेरिका ह्या कंपनीला १९५० च्या पहिल्या सहा महिन्यांत ११,९०,७८,२१८ डॉलर्स इतका नफा झाला. १९१७ सालानंतर ह्या कंपनीला एवढा नफा प्रथमच मिळत आहे.

**मध्य प्रदेशाची स्टेट ट्रॅन्सपोर्ट कंपनी**—मध्य प्रदेश सरकारनें प्रांताच्या स्टेट ट्रॅन्सपोर्ट कंपनीचें भांडवल १० लाखांवरून ३० लाखांपर्यंत वाढविण्याचें ठरविलें आहे. वाढवावयाच्या भांडवलापैकीं २५ टक्के भांडवल भारताच्या रेल्वे खात्यानें पुरवावें अशी विनंति करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांत बांगड्यांचा कारखाना**—फेरोझाबाद येथील जंगशाही कांचकारखान्यांतील कसबी कामगार निर्वासित म्हणून कराचीला गेले आहेत. निर्वासितांना आर्थिक मदत देणाऱ्या फिनान्स कॉर्पोरेशनतर्फे आतां नवा कारखाना काढण्यांत आला असून त्यांत हे कसबी कामगार काम करीत आहेत. ह्या कारखान्यांतील बांगड्यांच्या किंमती स्वस्त असून त्या चांगल्या प्रतीच्या असतात. पानिपत आणि नजिबाबाद येथून निर्वासित म्हणून आलेल्या कामगारांसाठी ब्लँकेटसचाही एक कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी पाकिस्तान सरकार ३ लाख रुपयांचें कर्ज देणार आहे.

**क्यूबाहून साखरेची आयात**—भारतांतील साखरेची टंचाई दूर करण्यासाठी क्यूबाहून सुमारें १ लाख टन साखर आयात करण्यांत येणार आहे असें समजतें. ही साखर दिवाळी सणापूर्वी बाजारांत येईल असा अंदाज आहे.

**रेशमाच्या किड्यांचें नवें खाद्य**—रेशमाच्या किड्यांचें खाद्य म्हणून तुतीच्या झाडांची पानें प्रसिद्ध आहेत. आतां सोव्हिएट शास्त्रज्ञांनीं असा शोध लावला आहे कीं, सायबेरियासारख्या अत्यंत थंड हवेंत बर्च ह्या झाडाचीं पानें खाऊन हा किडा जगूं शकतो. सायबेरियाच्या अरण्यांत बर्चचीं झाडें विपुल असल्यानें रशियांत रेशमाचा धंदा करण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे.

**रेडिओचें उत्पादन कमी होणार**—अमेरिकन सरकारनें सैन्याच्या व आरमाराच्या उपयोगासाठीं 'राडर' आणि इतर तत्सम वस्तूंचें उत्पादन वाढविण्याचें ठरविलें आहे. सरकारनें अशा प्रकारच्या ५० कोटी डॉलर्सच्या मालाची मागणी केली आहे. सरकारच्या ह्या मागणीमुळें अमेरिकेच्या रेडिओ आणि टेलिव्हिजनच्या उत्पादनांत मात्र घट होणार आहे.

**अर्जेंटायनाकडून गहूं मिळणार**—भारताकडून २०,००० टन तागाच्या वस्तू घेऊन अर्जेंटायना १,५६,००० टन गहूं देणार आहे. भारत आणि अर्जेंटायना ह्या देशांत पूर्वी झालेल्या कराराप्रमाणें ५५,००० टन तागाच्या वस्तूंच्या मोबदला ३,९०,००० टन गहूं घेण्याचा करार झाला होता. नवीन झालेला करार ह्याच कराराला जोडलेली पुस्ती आहे.

**सोव्हिएट रशियाचें औद्योगिक उत्पादन**—सोव्हिएट रशियानें पोलाद आणि तेल यांचें उत्पादन झपाट्यानें वाढविण्याचें ठरविलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत भांडवली माल व औद्योगिक यंत्रसामुग्री ह्यांच्या उत्पादनावर अधिक जोर देण्यांत येत आहे. अधिकृत आंकडेवारीप्रमाणें, गेल्या बारा महिन्यांत भांडवली मालाचें उत्पादन ३१ टक्क्यांनीं वाढलें आहे. एकूण औद्योगिक उत्पादन २१ टक्क्यांनीं वाढलें असून युद्धोत्तर पंचवार्षिक कार्यक्रम आधीच पूर्ण होत आला आहे.

**विजेच्या उपकरणांचा कारखाना**—म्हैसूर येथें काढण्यांत येणाऱ्या विजेच्या उपकरणाच्या कारखान्यासंबंधीं भारत सरकारच्या संस्थानी खात्याशीं चर्चा करण्याकरतां, म्हैसूरचे मजूर व वीज मंत्री श्री. भाष्यम् हे दिल्लीला गेले आहेत. अमेरिकेच्या वेस्टिंग हौस कॉर्पोरेशनकडून ह्या कारखान्याची योजना तयार होऊन आली आहे. कारखाना पूर्ण होण्यास १० वर्षे लागतील व त्यास ९ कोटी रु. खर्च येईल. हा कारखाना भारतीय सरकारच्या कोणत्याही योजनेशीं विसंगत होणार नाहीं अशा पद्धतीनें काढण्यांत येणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

## ॐ अर्थ ॐ

बुधवार, ता. ९ आगस्ट, १९५०



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

# कारखान्यांवरील पैशाचा ताण

### किंमत वाढीचा परिणाम

गेल्या कांहीं महिन्यांत प्रसिद्ध झालेल्या औद्योगिक कंपन्यांच्या ताळेबंदांची व अहवालांची छाननी केली, तर त्यांत रोकड रकमेचा तुटवडा ठळकपणें लक्षांत येतो. कंपन्यांच्या खेळत्या भांडवलाच्या किंवा त्यांच्या मासिक खर्चाच्या मानानें त्यांची बँकांत शिल्लक अपुरी आढळते आणि कंपन्यांना त्यांचे वाढीचे कार्यक्रम स्थगित करावे लागले असल्याचें स्पष्ट दिसून येतें. कंपन्यांच्या अध्यक्षांच्या भाषणांत ह्या गोष्टीचें स्पष्टीकरण बहुधा केलेलें असतेंच. मुख्यतः चढीच्या किंमती व कांहीं अंशीं भारी कर ह्यामुळें कंपन्यांना आपलें मूळ भांडवल कायम राखणें व वाढीचे कार्यक्रम हातीं घेणें कठीण झालें आहे. टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनीच्या ताज्या रिपोर्टांतील खालील उद्‌गार उद्‌बोधक आहेत:— "सध्याचा उपलब्ध पैसा आणि त्यांत नफ्यांतून घसारा व रिझर्व्ह ह्यांची पडणारी भर ही मामुली भांडवली खर्चास पुरेशी असली तरी उत्पादनवाढीचा कार्यक्रम हातीं घेण्यास लागणारे १२ कोटी रुपये त्यांतून निर्माण होऊं शकणार नाहींत." केवळ भारतांत आणि महाराष्ट्रांतच अशी परिस्थिति आहे, असें नाहीं. ग्रेट ब्रिटनमधील सोसायटी ऑफ इनकॉर्पोरेटेड अकौंटंटसच्या अध्यक्षांच्या ताज्या भाषणांत, कारखान्यांना पैशाचा कसा ताण पडत आहे, ह्याचें विवेचन आलें आहे. त्यांनीं एक उदाहरण घेऊनच आपलें म्हणणें स्पष्ट केलें आहे. १ लक्ष रुपये भांडवलानें एका औद्योगिक कंपनीनें १९०० सालीं धंदा सुरू केला, असें समजलें आणि १९४२ मधील किंमती १९०० च्या मानानें साडेतीनपट आहेत असें मानलें, तर त्या कारखान्याचें आजचें भांडवल ३,५०,००० रु. होणें अगत्याचें आहे. म्हणजे, त्यानें ४८ वर्षांत २,५०,००० रु. बाजूस टाकून ठेवले असणें आवश्यक झालें. ही निव्वळ रकम झाली. कराची आकारणी होण्यापूर्वीची रकम हिशोबांत घेणें जरूर आहे. ती घेतली तर २,५०,००० रु. बाजूस काढून टाकण्यासाठीं ४,४३,७०० रु. लागतील. समजा, कारखाना हें करूं शकला, तरी १९४९ सालीं तरतूद करावी लागेल ती ३,५०,००० रुपयांच्या हिशोबावरून. ह्या वर्षी किंमत ५% वाढली असें धरलें, तर त्याच्या तरतुदीसाठींच १७,५०० रु. लागतील. ६% डिव्हिडंडचे ३,३०० रु. मिळवल्यावर खालील हिशोब निघतो.

| | रु. | १,००,००० रु. वसूल भांडवलाशी प्रमाण % | ३,५०,००० रु. गुंतविलेल्या भांडवलाशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| करापूर्वीचा नफा | ४३,४०० | ४३·४ | १२·४ |
| कर | २२,५७७ | २२·६ | ६·५ |
| निव्वळ नफा | २०,८२३ | २०·८ | ५·९ |
| किंमत वाढीची तरतूद | १७,५०० | १७·५ | ५·० |
| | ३,३२३ | | |
| ६% डिव्हिडंड | ३,३०० | ३·३ | ०.९ |
| बाकी | २३ | | |

म्हणजे, मूळ भांडवल कायम राखण्यासाठीं आणि ६% डिव्हिडंड देण्यासाठीं कंपनीनें आपल्या वसूल भांडवलावर ४३.४ % ठोक नफा मिळविला पाहिजे, असें वरील उदाहरणांतील आंकड्यांवरून सहज लक्षांत येईल. इतकें करून, कारखान्याची यंत्रसामुग्री व उत्पादनशक्ति पूर्वीच्या पातळीवर राहील एवढेंच. त्यांत भर पडणार नाहींच. कारखान्याची प्रगति योग्य प्रकारें व्हावयाची असेल, आणि उत्पादनशक्ति व कार्यक्षमता वाढावयाची असेल, तर सध्याची ही परिस्थिति त्यास पोषक होणार नाहीं हें उघड आहे. नफ्यांतून कारखान्यांचें भांडवल वाढत गेलें पाहिजे. परंतु त्या नफ्यावर सरकार आणि कामगार ह्यांच्या मागण्यांचा ताण पडला तर जरूर ते रिझर्व्ह निर्माण होण्यास वाव उरत नाहीं. अनेक कंपन्यांच्या अध्यक्षांनीं ह्या प्रश्नाकडे सरकारचें व जनतेचें लक्ष अनेकवार वेधलेलें आहेच. कंपन्यांना नफा होऊन त्याचा उत्पादनाच्या दृष्टीनें योग्य विनियोग कसा झाला पाहिजे ह्याचा व्यापक आर्थिक दृष्टीनें आणि दूरदर्शीपणानें विचार करण्यांत आला पाहिजे.

आपल्या कित्येक कारखान्यांपुढें उत्पादनक्षमता टिकविण्याचा प्रश्न तांतडीचा नसून कारखाने कसे चालू ठेवावयाचे हा आहे. मजुरी कशी भागवावयाची, कच्च्या मालाची किंमत कशी द्यावयाची, ठेवींवरील व्याजाची व परतफेडीची तरतूद कशी करावयाची, नफा जाहीर केला तरी डिव्हिडंड वांटण्यास रकम कोठून आणावयाची, इत्यादि प्रश्नच इतक्या महत्त्वाचे आहेत, कीं दूरगामी विचार करण्यास कित्येक कारखान्यांना फुरसतच नाहीं. सुप्रतिष्ठित कंपन्या आपला व्यवहार स्वतःच्या भांडवलांतून व गंगाजळींतून भागवितात, इतकेंच नव्हे तर सरकारी रोख्यांत मोठाली गुंतवणूक करतात. तात्कालिक गरजा भागविण्यास त्याचा चांगला उपयोग होतो; धंद्यावर अनिष्ट परिणाम होऊं शकत नाहीं. स्वतःच्या अपुऱ्या भांडवलावर स्थापन झालेल्या कारखान्यांना ही सुस्थिति प्राप्त होण्याचे मार्गांत अनेक अडचणी असतात. जुन्या कारखान्यांनाहि अडचण भासते, तेथें नव्या कारखान्यांना ती जाचक होईल, यांत काय आश्चर्य? उत्कृष्ट मार्गदर्शन, परस्पर विश्वास, कार्यक्षमता, व्यापक दृष्टीनें विचार, इत्यादि गुणसुद्धां ह्या परिस्थितीस तोंड देण्यास कमी पडण्याचा संभव तेथें त्यांचा अभाव कितीतरी हानिकारक होईल

**पाकिस्तानसाठी जपानी यंत्रें**—पाकिस्तान सरकारनें कापडाच्या गिरण्यांच्या यंत्रांसाठीं जपानकडे फार मोठी मागणी केली असल्याचें समजतें. पाकिस्तानला जपानकडून ३०० माग, १,५०० चात्या आणि कांहीं सुटे भाग पाहिजे आहेत. ह्या सर्व मालाची किंमत अंदाजें ६,००,००० डॉलर्स होईल. ह्याशिवाय शेतीच्या अवजारांची मागणीही जपानकडे नोंदविण्यांत आली आहे.

**मोटारी घ्या व खजूर द्या**—पॅरिसमधील एका मोटारीच्या कारखानदारानें मोटारी घेऊन खजूर देण्यास तयार आहांत काय, अशी पृच्छा बसरा येथील खजूर संघाला केली आहे. खजूर संघाच्या एका अधिकाऱ्यानेंच हें वृत्त बाहेर फोडलें आहे. ह्या मागणीचा संघातर्फे विचार चालू आहे असें समजतें.

## टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.

### ३१ मार्च १९५० अखेरच्या वर्षासंबंधीं कांहीं आकडे

टाटा कंपनीस ३१ मार्च, १९५० अखेर संपलेल्या वर्षी ६ कोटी, २९ लक्ष रुपये ठोक नफा झाला. त्यापूर्वीच्या वर्षी तो ५ कोटी, १ लक्ष रुपये होता.

निव्वळ नफ्याची रक्कम गेल्या वर्षी १ कोटी, ५१ लक्ष रुपये होती, ती ३१ मार्च १९५० अखेरच्या वर्षी १ कोटी, ७१ लक्ष रु. झाली. बोनसमध्यें ५१ लक्ष रुपये व घसाऱ्यांत ५५ लक्ष रु. वाढ होऊनहि नफा वाढलेला आहे. ह्याचें कारण उत्पादनांत झालेली समाधानकारक वाढ हें होय.

**नफ्याच्या वाटणीचे तुलनात्मक आकडे**

(आकडे लक्ष रुपयांचे आहेत.)

| | १९४७–४८ | १९४८–४९ | १९४९–५० |
|---|---|---|---|
| मॅ. एजंटांचें कमिशन | ३८·९४ | २७·९४ | ३४·४२ |
| कर | १३०·०० | १५५·०० | १४५·०० |
| घसारा | १५०·०० | १५५·०० | २१०·०० |
| कामगारांना बोनस | ५७·०७ | ४१·६२ | ९२·९३ |
| रिझर्व्ह फंडाकडे वर्ग | —— | ३५·५७ | ४८·०३ |
| एकूण डिव्हिडंड | १३७·१९ | १३७·१९ | १५१·२० |

**उत्पादनांत वाढ**

| | १९४९–५० | १९४८–४९ | वाढ |
|---|---|---|---|
| | टन | टन | % |
| कोक | ९,५५,००० | ८,१६,००० | १७·० |
| पिग आयर्न | १०,३१,००० | ९,१७,००० | १२·४ |
| स्टील इनगॉट | १०,०५,००० | ९,०४,००० | ११·२ |
| विकाऊ स्टील | ७,२७,००० | ६,७१,००० | ८·३ |

जमशेटपूर येथील कामगारांच्या वृत्तींत सुधारणा झाल्यामुळेंच उत्पादनांत एवढी भर पडूं शकली. कारखान्यांतील यंत्रसामुग्रीची सुस्थिति, दुरुस्त्यांवरील मोठा खर्च, जुन्या यंत्रांचे जागीं नव्यांची उभारणी, इत्यादींमुळेंहि उत्पादन वाढलें. कामगारांच्या वाट्यास आलेली बोनसची रक्कम वाढली असली, तरी तिचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण ३२·२% वरून ३०·७% वर आलें. प्रत्येक कामगाराचें सरासरी उत्पन्न वाढलें, तरी दर टनी उत्पादन खर्च उतरला.

**प्रत्येक कामगाराचें सरासरी उत्पन्न व उत्पादन खर्च**

| वर्ष | रुपये | दर टनी रु. |
|---|---|---|
| १९३९–४० | ७६८ | ३१·५४ |
| १९४८–४९ | १५१२ | ९२·८० |
| १९४९–५० | १६२२ | ९१·८९ |

**उत्पन्नाची विभागणी**

(आकडे लक्ष रुपयांचे आहेत)

| | १९३९–४० | १९४५–४६ | १९४९–५० |
|---|---|---|---|
| कामगार | २७५ | ५४५ | ८८३ |
| कच्चा माल | २४७ | ४३३ | ६९५ |
| सरकार | १७६ | ४२३ | १९६ |
| वहातुक | २४९ | १७९ | ४५१ |
| दुरुस्ती व आवश्यक खर्च | ८३ | १६७ | २८७ |
| व्यवस्था | ९९ | १६५ | १३९ |
| रिझर्व्ह | ९६ | ८९ | ५३ |
| डिव्हिडंड | २२० | १८३ | १३४ |

**ताळेबंद**

टाटा कंपनीचा एकूण ताळेबंद ६४ कोटी, ५९ लक्ष रुपयांचा आहे. देणें बाजूस १०४७ लक्ष रुपये भांडवल, १०५१ लक्ष रुपये रिझर्व्ह व इतर फंड, २५८६ लक्ष रुपये घसारा फंड, इत्यादि प्रमुख आकडे आहेत. जिंदगीचे बाजूस ४१५३ लक्ष रुपये इमारत व यंत्रसामुग्री, ९८८ लक्ष रुपये स्टॉक व स्टोर्स, ३६५ लक्ष रु. रोख, असे आकडे आहेत.

**डिव्हिडंडचा सरासरी दर**

ऑर्डिनरीवर १६ रुपये आणि डिफर्डवर ७९ रु. ५ आ. डिव्हिडंड मिळणार आहे. तें विचारांत घेतलें, तर कंपनीच्या स्थापनेपासून ३१ मार्च १९५० अखेर ऑर्डिनरी भागांस दरसाल सरासरीनें १२·२५% डिव्हिडंड मिळालें आहे. डिफर्ड शेअर्सवर (प्रीमिअम धरून) २३·०७% डिव्हिडंड सुटलें आहे. १९१७ सालीं २६,२५० डिफर्ड शेअर्स प्रत्येकीं ३७० रु. प्रीमिअमनें कंपनीनें विकले होते.

---

### उद्यम औद्योगिक विकास विशेषांक

नागपूरच्या उद्यम मासिकाचा ऑगस्ट, १९५० चा अंक औद्योगिक विकास विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. राजकीय दृष्ट्या भारत स्वतंत्र झाला तरी त्याचे नागरिकांच्या आर्थिक जीवनावर सुपरिणाम झालेले दिसत नाहींत. उलट, आपल्या आर्थिक, औद्योगिक व म्हणूनच राजकीय आणि लष्करी भवितव्याबद्दल जाणत्या लोकांना काळजी वाटूं लागली आहे. उपाययोजना सुचविण्यांत येत आहेत, त्यांचा प्रत्यक्ष अनुभवहि उत्साहवर्धक नाहीं. अशा परिस्थितींत, सामान्य नागरिकांस आर्थिक बाबतींत जबाबदारीच्या जाणीवेनें अधिक लक्ष घालावयास लावणें अत्यंत अगत्याचें झालें आहे. आर्थिक घडामोडींची त्यांस माहिती करून देऊन त्यांच्या विचारास योग्य वळण लावण्याचें कार्य महत्त्वाचें असून, वृत्तपत्रांनीं त्याकडे लक्ष दिलें पाहिजे. उद्यम मासिक ह्या दृष्टीनें उपयुक्त कार्य करीत आहे. प्रस्तुत विशेषांक श्री. भा. म. काळे यांच्या लेखणींतून उतरला असून त्यांनीं भारताच्या औद्योगिक विकासाचें स्वरूप व योजना ह्याविषयीं तपशीलवार माहिती देऊन वास्तवतेला धरून योग्य अशा सूचना केल्या आहेत. श्री. काळे ह्यांच्या लेखनाचें वैशिष्ट्य म्हणजे शास्त्रशुद्ध विचारसरणी व बिनचूक आणि आकडेवार माहितीवर आधारलेले निष्कर्ष असें सांगतां येईल. प्रस्तुत विशेषांक त्यांनीं लिहिला असल्यानें त्याच्या उत्कृष्ट दर्जाबद्दल स्वतंत्र लिहिण्याचें कारण नाहीं. विशेषांकाची किंमत १ रु. ८ आ. आहे.

---

### मुंबई राज्यांतील सहकारी प्रवृत्ति

वरील विषयावर ता. ७ ऑगस्ट १९५० रोजीं सहकारी ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. डी. ए. शहा, एम्. ए., एलएल. बी. ह्यांचें मुंबई रेडिओवर भाषण झालें. हें गुजरातीमधील भाषण बडोदें आणि अहमदाबाद येथील रेडिओ केंद्रांनींहि त्याचवेळीं ध्वनिक्षेपित केलें.

---

**स्त्रिया अधिक दारू पितात**—ऑस्ट्रेलियांत दरवर्षी सुमारें १,१०,००,००० गॅलन दारू तयार होते. त्यापैकीं बहुतेक सर्व दारू स्त्रिया संपवितात असा अंदाज करण्यांत आला आहे. वरील अंदाजाप्रमाणें ऑस्ट्रेलियन पुरुषापेक्षां स्त्रियांनाच दारूच्या दर्दी म्हणून मानावें लागेल.

## बँकांचे १९४८ सालविषयक आकडे

**ठेवींत घट-बँकांची शहरांतून गर्दी-१०% बँकांकडे ९४% ठेवी**

रिझर्व्ह बँकेचें, बँकांसंबंधीं १९४८ सालविषयक आकडेवार माहितीचें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यांतील कांहीं आकडे खालीं दिले आहेत:—

**जॉइंट स्टॉक बँकांची परिस्थिति**

( आकडे लक्ष रुपयांचे )

| | ठेवी | रोकड | कर्जे | कचेऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १९४६ | १०२५,७६ | १७७,४७ | ४६५,७१ | ४,८५५ |
| १९४७ | १०५११,७७ | १५०,६४ | ४८०,४८ | ४,७९२ |
| १९४८ | १००९,९७ | १६६,८४ | ५०१,८६ | ४,६८० |

**बँकांची शहरांतून गर्दी**

जेथें बँक कचेऱ्या आहेत, त्या गावांतून प्रत्येक ७,२१९ लोकवस्तीस एक बँक कचेरी असें प्रमाण पडतें. परंतु समंघ भारताची लोकसंख्या विचारांत घेतली, तर ६५,८८४ लोकवस्तीस एक बँक कचेरी असें प्रमाण येतें. मोठ्या शहरांतूनच बँक कचेऱ्यांची कशी गर्दी झाली आहे, हें खालील तक्ता स्पष्ट करील.

| लोकवस्ती | गांवांची संख्या | बँक कचेऱ्या |
|---|---|---|
| १ लाखाचे वर | ५० | १६०२ |
| १ लाख ते ५०,००० | ८४ | ७३३ |
| ५०,०००-१०,००० | ६६२ | १८९५ |
| १०,०००-५,००० | ३६० | ५६८ |
| ५,००० आणि कमी | १७१ | २३७ |
| छाननी न केलेल्या | २०७ | २४२ |
| एकूण | १५३४ | ५२७७ |

**१०% बँकांकडे ९४% ठेवी**

शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत १९४८ मध्यें ३४ कोटींची घट झाली. मुदती ठेवी २० कोटींनीं कमी झाल्या, चालू ठेवी १२ कोटींनीं घटल्या आणि इतर ठेवींत ६ कोटींचा उतार झाला. सेव्हिंग्ज ठेवी ४ कोटींनीं वाढल्या. भारतांतील सर्व बँकांच्या एकूण ठेवींपैकीं ९४% ठेवी फक्त १०% बँकांच्याकडे आहेत आणि सात मोठ्या शेड्यूल्ड बँकांकडे मिळून एकूण ठेवींच्या दोनतृतीयांश ठेवी आहेत.

---

**पाकिस्तानांतील दोन बँकांकडे २५ लाखांची मागणी**

पंजाब नॅशनल बँक व प्रभात बँक ह्यांना पाकिस्तान सरकारनें अनुक्रमें ११ लाख व १४ लाख रुपये भरण्यास सांगितलें आहे, असें समजतें. योग्य अधिकाऱ्याच्या परवानगीवांचून त्यांनीं "निर्वासित" मालमत्ता विकली असें पाकिस्तान सरकारचें म्हणणें आहे. ही मालमत्ता "निर्वासित" असल्याचें सरकारनें त्यापूर्वी कधींच जाहीर केलेलें नव्हतें, त्यामुळें कस्टोडिअनची परवानगी घेण्याचा प्रश्नच उरला नाहीं, असें बँकांचें त्यास उत्तर आहे.

**हिन्द सायकल्स लि.**

वरील कंपनीनें १९४९ मध्यें ६२,७८९ सायकली विकल्या त्यांची किंमत ६६ लक्ष रु. भरली. १९४८ सालीं ५४ लक्ष रु. च्या ४३,५९४ सायकली तयार झाल्या होत्या. १९४९ मध्यें ६,९८,००० रु. घसारा काढल्यावर कंपनीस ४६,२१६ रु. नफा उरला. १९४९ सालीं १,६०,३६३ रु. नफा झाला होता. नफा कमी उरला तरी कंपनीनें ५ रु. डिव्हिडंड कायम राखलें आहे.

**आर्थिक परिस्थितीविषयीं अर्थमंत्र्यांचे सावधागिरीचे उद्गार**

हिंदी पार्लमेंटांत अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं भारताच्या सध्यांच्या आर्थिक स्थितीविषयीं बोलतांना अत्यंत सावधगिरीनें विधानें केलीं. आर्थिक परिस्थिति विकट आहे, परंतु आंवाक्याबाहेर आणि निराशाजनक नाहीं, सरकारच्या अधिकाराबाहेरील कारणांमुळें ती कदाचित अधिक बिघडेलहि, गंभीर प्रकारावर तसेंच जालीम उपाय आवश्यक होतील, इत्यादि अर्थपूर्ण शब्दांत त्यांनीं सध्यांच्या परिस्थितीचें वर्णन करून योग्य ती उपाययोजना आखण्यास सरकारला थोडा अवधी लागेल असें सांगितलें. परिस्थितीशीं झगडून ती आवाक्यांत आणण्यासाठीं सरकारला तातडीचे खास अधिकार कदाचित् आवश्यक होतील. सरकारी धोरणाचीं मुख्य उद्दिष्टें त्यांनीं खालील शब्दांत सांगितलीं.

( १ ) चलनवाढ आणखी होऊं द्यावयाची नाहीं.

( २ ) काटकसर घडवून आणण्यांत कसूर करावयाची नाहीं.

( ३ ) शेजारच्या देशांशीं असलेल्या आर्थिक व राजकीय संबंधामुळें देशाच्या आर्थिक संसारावर पडणारा ताण कमी करणें.

( ४ ) अन्न, कपास व ताग ह्यांत स्वावलंबी होण्याच्या योजना पार पाडणें.

( ५ ) औद्योगिक उत्पादन अधिकांत अधिक होईल, असें वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न अखंड चालू ठेवणें.

( ६ ) खेडेगांवांतील लोकांना वर्षभर पुरेसें काम नसतें, ते मिळवून देण्यास सहाय्य करणें.

( ७ ) किंमतींच्या पातळीकडे लक्ष ठेवून, ती मर्यादेंत राखणें.

( ८ ) देशाच्या मर्यादित साधनांचा पद्धतशीर उपयोग करून त्यापासून अधिकांत अधिक हित साधणें.

---

**सहकारी प्रश्नांची चर्चा**

नाशिक जिल्ह्यांतील ता. को. सुपरवायझिंग व सेल युनिअन्सच्या विनंतीवरून जिल्ह्यांतील सहकारी क्षेत्रांत आज ज्या अडीअडचणी येत आहेत, तसेंच सोसायट्यांबाबत यापुढें जें धोरण असावयास पाहिजे व जें कार्य करावयास पाहिजे त्या सर्वांनीं खातें व बँक अधिकारी यांचेशीं मोकळ्या मनानें विचारविनिमय करून निश्चित योजना आखण्यासाठीं सटाणा येथें ता. ५-८-१९५० रोजीं सोमवारीं दुपारीं १ वाजतां सेल युनिअनच्या मीटिंग हॉलमध्यें बैठक भरली होती.

---

**मद्रासला तयार होणारे हातरुमाल**—मद्रासला तयार होणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या हातरुमालासाठी सुताचा पुरवठा करण्याबद्दल मद्रासच्या डायरेक्टर ऑफ कंट्रोल्ड कमॉडिटीज ह्यांच्याशीं हातरुमालाच्या कंपन्यांनीं विचारविनिमय केला. हा हातरुमाल ३ चौरस फूट असतो आणि त्याला एक प्रकारचा रंग देण्यांत येतो. हे हातरुमाल पश्चिम आफ्रिकेंत मोठ्या आवडीनें लोक वापरतात.

**बँक डिस्प्यूट्स ट्रायब्यूनल**—ऑल इंडिया इंडस्ट्रियल ट्रायब्यूनलनें ( बँक डिस्प्यूट्स ) आपला निर्णय भारत सरकारकडे पाठविला आहे असें समजतें. ट्रायब्यूनलकडे, ८३ शेड्यूल्ड बँकांतील आणि १२२ नॉन शेड्यूल्ड बँकांतील निरनिराळ्या ३८ बाबी निर्णयासाठी सोंपविण्यांत आल्या होत्या. ह्या बाबींत वेतन श्रेणी, महागाई व भत्ते, रजेचे नियम, कामाचे तास, इत्यादि अनेक प्रश्न होते.

## तुम्हांस स्वतंत्र व्यवसाय पाहिजे काय ?

लेखक श्री. ना. अ. तेंडोलकर,
मॅ. डॉयरेक्टर, दि हिंद एजन्सीज लि., कोल्हापूर.

आम्हांस येणाऱ्या अनेक पत्रांतून व प्रत्यक्ष मुलाखतींतून एक मुख्य गोष्ट आढळते. ती म्हणजे हजारो तरुणांना आपण स्वतःच्या मालकीचा कांहीं उद्योग–व्यवसाय करावा, अशी असणारी तीव्र इच्छा! पण सुरवात कशी करावी व पुढें व्यवसाय कसा चालवावा यार्चें त्यांना कोडें असतें. यासंबंधीं आमचा जो कांहीं अनुभव किंवा अभ्यास आहे त्याप्रमाणें पहातां खालील "उद्योग सूत्रें" कांहींशीं मार्गदर्शक होतील अशी आम्हांस आशा आहे.

**धंदा कोणता करावा?** कोणताही. तुम्हांस प्रथम जो करावासा वाटेल तो किंवा तुमच्या आजुबाजूस यशस्वी रीत्या चालला असेल तो. कारण सुरवातीचा धंदा हा नेहमींच योग्य असतो असें नाहीं. परंतु यामुळें तुम्हांस पुढील प्रगतीचे मार्ग दिसूं लागतील.

जगांतील कोणताही धंदा हलका अगर श्रेष्ठ नाहीं. अमूक एका धंद्यांत पैसा मिळतो व तमक्यांत मिळत नाहीं, असेंही नाहीं. कोणताही उद्योग अथवा व्यवसाय पूर्वीपेक्षां अधिक चांगल्याप्रकारें मनःपूर्वक केल्यास, त्यांत यश हें ठरलेलेंच. जगांतील सर्वच व्यवसाय श्रेष्ठ व्यवसाय असून पैसा आणि नांवलौकिक सर्वांत आहे.

**धंदा कोठें करावा?** तुम्हीं असाल तेथें. मात्र असें करतांना भोवतालच्या परिस्थितीचा थोडाफार आढावा घेतलाच पाहिजे. लॉन्ड्री ड्रुंट दूरवरच्या खेड्यांतही चालू शकेल परंतु त्यासाठी तुमच्यांत कांहींतरी खास वैशिष्ट्यें असावीं लागतील. पण तुम्हास तेथें कार्यक्षेत्र नाहीं असें आढळल्यास नाजिकच्या वाढत्या व उद्योगी गांवीं जा व तेथें धंदा सुरू करा.

**धंदा कसा सुरू करावा?** तुमचेपाशीं जर स्वतःचें भरपूर भांडवल असेल तर एकादा चांगला अनुभवी मॅनेजर नेमा. स्वतःची मेहनत व देखरेख आणि त्याची बुद्धी व अनुभव यांच्या साह्यानें तुम्हीं कोणताही धंदा यशस्वी रीत्या चालवूं शकाल, पण थोडें भांडवल असेल तर मात्र एक–दोन वर्षे नाणावलेल्या कंपनींत अथवा संस्थेंत उमेदवारी करा. त्यांच्या खर्चानें व्यवहारी ज्ञान व अनुभव शिका. सर्व अंगें जास्त मेहनत घेऊन आत्मसात करा व मग व धंद्यास सुरवात करा. म्हणजे सुरवातींसच धंद्यांत ठोकर बसून धंदा बंद करण्याची तुमच्यावर पाळी येणार नाहीं.

एखाद्या नव्या धंद्यांत भांडवल गुंतविण्यापूर्वी त्या धंद्याची पूर्ण माहिती घेतल्याखेरीज भांडवल गुंतविणें नेहमींच धोक्याचें ठरतें.

भांडवल थोडें असेल तर तें नेहमीं झटपट खपणाऱ्या लोकप्रिय मालांतच गुंतवा. कोणत्याही एका प्रकारच्या मालांत जास्त पैसा गुंतवूं नका. थोडा नफा व मोठा व्यापार हें धोरण ठेवा. पण या बरोबरच बिन-नफ्याचा व्यवहार हा तोट्याचा व्यवहार हेंही विसरूं नका. खर्च अत्यंत कमींत कमी राखा. भांडवल शोभा व डामडौल यांत न गुंतवितां तें मालांतच गुंतवा. जास्त मेहनत घ्या, अधिक विचार करा व सचोटीचा व्यवहार ठेवून पत वाढवा. धंद्यांतील भांडवल त्यांतच गुंतवीत जा. आस्ते आस्ते भांडवल मिळत अथवा वाढत जाईल. कारण भांडवल हें त्याच्या मागें लागून नेहमी मिळतेंच असें नाहीं.

तुमचा ज्या प्रकारचा धंदा असेल त्याच प्रकारच्या धंद्यांतील इतर व्यापारी वर्गाशी मैत्रीचे संबंध राखा, त्यांचें तुम्हास मोठें सहाय्य व मार्गदर्शन होईल.

दुसरें म्हणजे अशावेळीं जास्तींत जास्त नम्रतापूर्वक धंदा करणे आवश्यक असतें. कारण जनतेची वाढती सहानुभूति हेंही एक मोठें भांडवल आहे.

आपलें भांडवल पाहूनच धंद्याचे व्याप वाढवा. धंदा किफायतशीर दिसला म्हणून ताकतीपेक्षा अधिक केल्यास संकटेंच ओढवतील. कोणत्याही मालाची अधिक खरेदी केल्यास अगर कुवतीपेक्षा मोठा व्यवहार केल्यास धंदा बंद करण्याची पाळी येईल. धंदा शक्य तो स्वतःचे भांडवलावर करा किंवा फारतर तुमच्या भांडवलाच्या निम्म्यानेच कर्ज घ्या. पण भांडवलाइतकें किंवा त्यापेक्षां अधिक कर्ज काढून धंदा केल्यास असलेलें भांडवलही गमावून बसाल.

गिऱ्हाईक जर तुमच्याकडे अधिक यावेसें वाटत असेल तर इतरांपेक्षा तुम्ही आघाडीवर असणें व तुमच्यांत कांहीं खास वैशिष्ट्यें ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. नम्रतापूर्वक वागणूक, शब्दांतील व कृतींतील प्रामाणिकपणा व बक्षीसपणा हे गुण नेहमीच लाभदायक असतात.

स्वस्त विकण्यास परवडतें म्हणून कचरा माल विकूं नका. कारण, गिऱ्हाइकास माल पाहिजे असतो. अधिक चांगल्या प्रतीचा व खात्रीलायक माल विकणारी संस्था म्हणून नांवलौकिक वाढवा. तुमची किंमत अधिक कां, तें शास्त्रशुद्ध रीत्या पटवून द्या. हेंच धोरण फायदेशीर असल्याचें आढळून येईल.

नेहमीं चांगल्या व्यापारी संस्थांशीच व्यवहार ठेवा. स्वस्त मिळतो म्हणून अनभिज्ञ कंपनीशी व्यवहार केल्यास सर्वच रकम गमाविण्याची एक दिवस पाळी येईल किंवा कचरा माल गळ्यांत बांधला जाईल व मोठी नुकसानी सोसावी लागेल.

व्यवहारांत मालाची विक्री करण्यापेक्षाही रोखीचे व्यवहार करण्यांतच अधिक कौशल्य आहे. मोठ्या व्यापारामागें लागून उधारीने व्यवहार केल्यास दोन रुपयाच्या कमाईसाठीं शंभर रुपये गमविण्याची पाळी येईल. अल्पावधींत तुमचा धंदाही बंद पडेल. व्यवहारांत स्पष्टपणें पण नम्रतापूर्वक "नकार" देण्याचें धाडस आवश्यक आहे.

मुख्य म्हणजे नेहमी विद्यार्थी वृत्ती ठेवा. आपल्या मालाचा व गिऱ्हाइकांचा सतत अभ्यास करा. त्याचा दैनंदिन व्यवहारांत उपयोग करा, अडीअडचणी व अपयश किंवा संकटें यांनीं भिऊन जाऊ नका, अथवा पळहि काढूं नका. श्रम आणि चिकाटी यांचे जोरावर कोणत्याही गोष्टींत यश मिळविणें अवघड नाहीं. तुम्हास मोठ्या गोष्टी मोठ्या प्रमाणावर करता येत नाहींत याचें दुःख न मानता, दैनंदिन लहानसहान गोष्टी देखील मोठ्या काळजीपूर्वक व परिश्रम घेऊन करा. त्यांतच खरा मोठेपणा आहे, त्यांतच धंद्याच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

---

**बिन तिकिटाचे प्रवासी**—१९४८-४९ सालीं सुमारें ६०,००० उतारूंनीं तिकिट न घेतां, अगर खालच्या दराचीं तिकिटें घेऊन वरच्या दराच्या डब्यांतून प्रवास केला. ज्या मुक्कामाला जावयाचें असेल, त्याच्या अलीकडील मुक्कामाचीं तिकिटें काढलेले उतारूही वरील संख्येंत धरण्यांत आले आहेत. ह्या फुकट्या उतारूंकडून १,५०,००,००० रुपये वसूल करण्यांत आले.

**जगांतील सगळ्यांत नवें विद्यापीठ**—मलायांत आठ महिन्यांपूर्वीं प्रथमच एका विद्यापीठाची स्थापन करण्यांत आली आहे. ह्या विद्यापीठाचा पदवीदान समारंभ नुकताच झाला. ६९ उमेदवारांना पदव्या देण्यांत आल्या, त्यांत ११ हिंदी नागरिक आहेत. कांहीं हिंदी स्त्रियांनींहि पदव्या मिळविल्या.

## भारत आणि इंडोनेशिआ ह्यांच्यामधील व्यापार

भारत आणि इंडोनेशिआ ह्या दोन देशांमधील व्यापार वाढीस लावण्यासाठी भारत सरकार लवकरच एक प्रतिनिधी-मंडळ इंडोनेशिआला पाठविणार आहे. ह्या दोन देशांमधील व्यापार प्राचीन कालांतही चालत असे असा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध आहे. दोन्ही देश आतां स्वतंत्र झाले असल्यामुळें ह्या व्यापारी परंपरेचें पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न व्हावे हें साहजिकच आहे. भारताच्या प्रतिनिधी-मंडळावर बहुतेक प्रतिनिधी व्यापाऱ्यांचे असतील असें समजतें. मंडळाबरोबर चिटणिसाचें काम पहाण्यासाठी म्हणून भारताच्या व्यापार-खात्याचा एक अधिकारीही जाणार आहे.

युद्धापूर्वींहि भारताचा इंडोनेशिआशीं बराच व्यापार होत असे. इंडोनेशिआकडून भारत साखर, खनिज तेलें, क्विनिन, मसाल्याचे पदार्थ, टाकचें लाकूड इत्यादि वस्तू आयात करीत असे. उलटपक्षीं भारताकडून तागाच्या वस्तू, कापड, कोळसा, गळिताचीं धान्यें, लाख, चायें इत्यादि माल निर्यात होत असे. दुसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या कांहीं वर्षांत वार्षिक सरासरी आयात २०८ लाख रुपयांची आणि निर्यात १०९ लाख रुपयांची होत असे. १९४१-४२ सालीं भारत-इंडोनेशिआ व्यापारानें उच्चांक गांठला. भारतानें ५३२ लाख रुपयांचा माल निर्यात केला आणि ३०४ लाख रुपयांचा माल आयात केला. इंडोनेशिआ युद्धांत गुरफटल्यावर व्यापार कमी होत चालला आणि १९४४-४५ सालीं पूर्णपणें थांबला. युद्धानंतर १९४९-५० सालीं प्रथमच युद्धपूर्व कालाइतका व्यापार पुन्हा होऊं लागला. तथापि, भारताला इंडोनेशिआकडून मिळणारी साखर मात्र मिळेनाशीं झाली. बाकी मालाची देवघेव पूर्वीप्रमाणेंच चालू झाली. युद्धापूर्वी भारताची आयात निर्यातीपेक्षां जास्त होत असे. युद्धानंतर मात्र भारत आयातीपेक्षां निर्यात अधिक करूं लागला. १९४९-५० मध्यें भारताची आयात निर्यातीपेक्षां पुन्हा अधिक झाली आहे. भारत आणि इंडोनेशिआ ह्यांचा व्यापार परस्परांना पोषक होण्यासारखा आहे. पूर्वी होत असलेल्या देवघेवीच्या कक्षेबाहेरील कांहीं माल दोन्ही देश एकमेकांना पुरवूं शकतील अशी अपेक्षा आहे. भारताकडून इंडोनेशिआला हत्यारें, शेतीचीं किरकोळ अवजारें, धातूंचे पदार्थ, इलेक्ट्रिक मोटर्स, औषधें, रसायनें; इत्यादी माल मिळण्यासारखा आहे. इंडोनेशिआ भारताला टिन, जस्त, धान्य-विशेषत: तांदूळ आणि मका-खोबरेल तेल, खोबरें व सुपाऱ्या पुरवूं शकेल.

इंडोनेशिआच्या मानानें भारत औद्योगिक दृष्ट्या अधिक पुढारलेला असल्यामुळें उभयपक्षीं सोइस्कर असा व्यापारी करार करण्यांत भारताच्या प्रतिनिधी मंडळाला यश आलें तर तें स्वागतार्हच होईल.

---

**सोव्हिएट रशियांतील चित्रपट**—रशियांत तयार होणाऱ्या चित्रपटांपैकीं ८० टक्के चित्रपट लवकरच नैसर्गिक रंगांत निघूं लागतील. पडद्यावरील दृश्यांत खोली दाखविणारीं ३ चित्रपटगृहें रशियांत लोकप्रिय होऊं लागलीं आहेत. सध्यां रशियात ५०,००० चित्रपटगृहें असून १९५१ अखेर त्यांची संख्या ७५,००० होईल असें समजतें.

**कार्बन पेपर्सच्या धंद्याला मदत**—रायपूर येथील श्री. गो. म. काळे ह्यांच्या कार्बन पेपर्स तयार करण्याच्या धंद्याला मदत म्हणून ३,००० रु. मध्यप्रदेश सरकारनें मंजूर केले आहेत. छोट्या उद्योगधंद्यांना मदत देण्याच्या सरकारच्या धोरणानुसार हें कर्ज देण्यांत आलें आहे.

**कूळ व शेतजमीन कायदा**

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं ४ रु. कूळकायदा (१९३९) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या-प्रतिबंधक कायदा (आवृत्ति ३ री) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., संडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ता:-लॉ अॅकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.



## फाऊंटन पेनच्या शाईचा धंदा

### ३७½% महसूल जकातीचें संरक्षक जकातींत रूपांतर

फाऊंटन पेनच्या शाईच्या धंद्यास संरक्षण देण्याच्या मागणीची चौकशी करण्यास ऑगष्ट १९४९ मध्यें टॅरिफ बोर्डाला सांगण्यांत आलें होतें. या बाबतींत बोर्डानें केलेल्या प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणें आहेत.– (१) किंमतीच्या ३७॥ टक्के या प्रमाणांत सध्यां घेण्यांत येणाऱ्या महसूल जकातीचें तितक्याच प्रमाणांत संरक्षक जकात म्हणून रूपांतर करावें व तीं तीन वर्षेपर्यंत चालू रहावी. (२) आधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणें मिळविण्यासाठीं सरकारनें फाऊंटन पेन शाईच्या कारखानदारांना सर्व प्रकारच्या सवलती द्याव्यात. (३) फाऊंटन पेन शाई परदेशांत निर्यात करूं शकणाऱ्या कारखानदारांना उत्तेजन द्यावें. (४) सरकार–पुरस्कृत संशोधन संस्थांनीं भारतांत तयार झालेल्या शाईचा दर्जा सुधारण्याच्या शक्यतेचा विचार करावा. (५) मध्य व राज्य सरकारांनीं आपल्यासाठीं शाई खरेदी करतांना देशी शाईच खरेदी करावी. (६) इंडियन स्टँडर्डस इन्स्टिटयूशननें आधींच हातीं घेतलेलें शाईचा दर्जा प्रमाणित करण्याचें काम शक्य तितक्या लवकर पुरें करावें आणि कारखानदारांनीं शक्य तितक्या लवकर त्याप्रमाणें उत्पादन करावें. (७) या धंद्यानें एक अखिल भारतीय संघटना तयार करून त्यामध्यें देशांतील सर्व घटकांचा समावेश करून घ्यावा. या संघटनेनें उत्पादन, आयात वगैरेबद्दलची आंकडेवारी तयार करून आपल्या सदस्यांस पुरवावी.


---

**सावकारीचा व्यवसाय**—मुंबई सावकारी कायद्याखालील ९ ए नियमाप्रमाणें कराव्या लागणाऱ्या गोष्टींपासून सूट देण्याचा अधिकार रजिस्ट्रार जनरल आणि रजिस्ट्रार ऑफ मनिलेंडर्स ह्यांना देण्यांत आला आहे. वरील नियमाप्रमाणें प्रत्येक सावकाराला आपला परवाना व्यवसायाच्या जागीं ठळकपणें लावावा लागतो, त्याचप्रमाणें व्यवसायाच्या जागीं सावकाराच्या नांवाची पाटी आणि परवाना नंबरही लावावा लागतो.

**अमेरिकन चित्रपटाचा धंदा मंदींत**—ब्रिटनमध्यें दाखविल्या जाणाऱ्या अमेरिकन बोलपटांवर होणारा सर्व नफा अमेरिकन कंपन्यांना मिळाला पाहिजे असा आग्रह धरण्यांत येत आहे. ब्रिटनची आर्थिक परिस्थिति आतां सुधारली असल्यानें ही मागणी करण्यांत आली आहे. अमेरिकन चित्रपटाच्या धंद्याला मंदी आली असून हॉलिवुडमध्यें बेकारी उसळली असल्यामुळें वरील मागणीला जोर आला आहे.

**सायकलीवर जगाचा प्रवास**—दोन ब्रिटिश तरुणांनीं सायकलीवरून जगाचा प्रवास करण्याचें ठरविलें आहे. त्यापैकीं एका तरुणाचा एक पाय लाकडी आहे. सदर तरुण २३ वर्षांचा असून वय होण्यापूर्वी जग पहाण्याची त्याची इच्छा आहे. हे दोघे तरूण फ्रान्स, इटली, उत्तर आफ्रिका, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, दक्षिण अमेरिका व कॅनडा ह्या देशांतून आपला मार्ग काढणार आहेत.

**डॉलर्स अधिक मिळविणारे देश**—१९५० च्या एप्रिल आणि मे महिन्यांत पाकिस्तान, अफगाणिस्तान, सयाम आणि मलाया ह्या देशांनीं आपली निर्यात डॉलर्सच्या कक्षेंतील देशांत वाढविली.





**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

स्थापना–१९१७

फोन नं. २४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ५११

**मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–: शाखा :–

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर व पौड**

—ःबँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

**मो. वि. खडे**
मॅनेजिंग डायरेक्टर





---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.